# प्रकरण - ३ रे

## विषय : हायकू काव्यप्रकारातील रचनासौंदर्य

# प्रकरण - ३ रे

## हायकू काव्यप्रकारातील रचना सौंदर्य

**हायकूचे रचनातंत्र -**

हायकू या काव्य प्रकाराचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे की, ही तीन ओळींची रचना असते. तीनच ओळींची रचना का ? याला उत्तर नाही. जपानी काव्यप्रकारात तो एक पारंपारिक विशेष आहे. या तीन ओळींची अशी रचना यात केलेलीअसते. साधारणत: पहिल्या दोन ओळीत एखाद्या विशिष्ठ घटनेचे वर्णन आणि तिसऱ्या ओळीत दुसऱ्या एखाद्या घटनेचे वर्णन. यामुळे हायकू काव्यरचनेत एक प्रकारचा ' तोल ' सांभाळला जातो. हायकूतील वर्णनाला त्यामुळे उठाव मिळतो. अर्थपूर्णता प्राप्त होते.

उदा. - हेवा वाटावा अशी देखणी
पानं दिसू लागली आहेत
लौकरच जी गळणार आहेत

- शिकि

(ध्रुवा पृ. ६०)

कधी कळत नाही पानांना
कुठलं पान आधीच गळेल
वाऱ्याला ते ठाऊक असेल ?

- सोसेकी

(ध्रुवा पृ. ५२)

शेतातून वेगानं जाताना

अड कला पात्र म्हणून पाहयलं वाकून

तर नाजुकशी फुलांची वेल.

- शिरीष पै 'हायकू'

(पृ. क्र. ८)

माझं प्रेम .... माझा अभिमान ...

झुंज असह्य झालीय.

वादळात बाग जळालीय

- शिरीष पै 'हायकू'

(पृ. क्र. १३)

अशा प्रकारे हायकूमध्ये निसर्गाच्या, एखाद्या दृश्याचे,घटनेचे तीन ओळीत चित्रण केलेले असते.

**अल्पाक्षररमणीयत्व -**

' हायकू ' ह्या काव्यरचनेचा एक महत्वाचा विशेष म्हणजे त्यातीत शब्दरचना. हायकूमध्ये कमीतकमी शब्द वापरावे लागतात. प्रत्येक शब्द कमालीचा सूचक व अर्थपूर्ण असावा लागतो. एकच शब्दात अनेक गोष्टी सुचवितो.

उदा. - एक कोकिळा साद घालते

बांबूचं बन

चंद्राकिरणांनी उजळते.

येथे कोकिळा या शब्दावरुन ही वसंत ऋतूत घडलेली घटना आहे, हे जाणवते.

उदासलेलं माझं मन
इतक प्रसन्न कसं झालं ?
साधं पाखरु तर बागेत चिवचिवलं

- शिरीष पै 'ध्रुवा '
(पृ. क्र. २५)

नको रे धरुस चिमट़ीत
फुलपाखराचं नाजुक अंग
अधीच दुखतोय पंखावरलारंग

- शिरीष पै 'ध्रुवा '
(पृ. क्र. २७)

या हायकूत ' उदासलेलं मन ', ' प्रसन्न ', ' चिवचिवलं ' या तीन शब्दांमुळे अर्थाला व्यापकता प्राप्त होते.

अल्पाक्षरासाठी मूळ जपानी हायकूमध्ये ५ - ७ - ५ असे शब्दावयव असावेत असा एक संकेत आहे. पहिल्या ओळीत ५ शब्दावयव , दुसऱ्या ओळीत ७ शब्दावयव आणि तिसऱ्या ओळील पुन्हा ५ शब्दावयव असावे असा संकेत आहे. परंतु जपानी लिपी ही चित्रलिपी असल्यामुळे हा नियम मराठी सारख्या भाषेत तंतोतंत पाळणे अवघड आहे. हायकूमध्ये किती शब्दावयव असावेत यासंबंधी शिरीष पै व सुरेश माथुरे यांच्यात काही मतभेद आहेत. त्याची चर्चा पहिल्या प्रकरणात पृ..क्र. ९२ केली आहे. एखाद्या परकीय भाषेतून

काव्यप्रकार घेताना अशा प्रकारच्या अडचणी येतात तेव्हा थोडेसे स्वातंत्र्य घ्यावेच लागेल. या संदर्भात असा प्रश्न उपस्थित होतो की, तंत्राला किती महत्व द्यायचे ? ' तंत्र ' महत्वाचे की ' मंत्र ' महत्वाचे ? तंत्रापेक्षा मंत्र महत्वाचे असल्याने त्यालाच प्राधान्य द्यावे लागते. म्हणजे रचनेपेक्षा आशयाला महत्व देणे आवश्यक ठरते. तेंव्हा तंत्रातील कोणते व किती नियम स्वीकारावयाचे याचा विचार करावा लागतो. ५ - ७ - ५ हा जपानी हायकूचा प्रकार आणि तो स्वीकारणे अवघड असल्याने श्री. सुरेश मथुरे यांनी ७ - ९ - ७ हा सुचविलेला प्रकार स्वीकारणेही अवघड आहे. यातील एक मध्यम मार्ग असा सुचविता येईल की, पहिल्या ओळीत जेवढे शब्दावयव असतात तेवढे तिसऱ्या ओळीत असावेत. हे मराठी भाषारचनेच्या दृष्टिकोनातून योग्य आहे. कारण प्रत्येक भाषेची प्रकृती वेगळी असते. एक मात्र खरे की, हायकू या काव्यप्रकारात मोजक्या शब्दांची योजना करणे आवश्यक आहे आणि तेही शब्द रचनेच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहेत. येथे विस्ताराला स्थान नाही. शब्दच असे असावेत की, अर्थाच्या विस्ताराचा तो अर्क असावा.

**चित्रमय शैली -**

'हायकू' या काव्यप्रकारात निसर्गवर्णनाने जी भाषा वापरलेली असते, ती चित्रमय असणे महत्वाचे असते. पहिल्या प्रकरणात वर्णन केल्याप्रमाणे हायकूमध्ये निसर्गातील घटनेचे वर्णन केलेले असते, पण ते वर्णन नेमके असते. या संदर्भात शिरीष पै यांनी केलेले विवेचन महत्वाचे वाटते, '' एखाद्या चित्रात जे सामर्थ्य असते, तेच बऱ्याच अंशी हायकूत असू शकते, एखादे सुंदरसे चित्र विशेषत: एखादाच मोजका रंग वापरून अगदी मोजक्याच रेषांतून उभे केलेले एखादे जुन्या शैलीतले चिनी चित्र पाहताच आपण एकाएकी स्तब्ध होतो. हृदयात प्रशंसा दाटून आल्याने आपला श्वास जणू एकाएकी थबकतो. अशा चित्रात प्रत्यक्ष चित्राने फार थोडी जागा व्यापलेली असते. चित्रातली बाकीची जागा कोरीच सोडलेली असते.

चित्रातल्या सौंदर्यचे कारण शोधण्यासाठी आपल्याला जाणीवपूर्वक असा कुठलाच प्रयत्न करावा लागत नाही. चित्र बघताक्षणी तत्काळ त्यातील सौंदर्याचा साक्षात्कार आपल्याला होतो - चांगला हायकू वाचल्यानंतर जवळ ज़वळ हीच क्रिया घडून येते. चित्रकलेतील हा अनुभवहायकू या काव्यप्रकारातही आढळतो.''[१] हायकू या काव्यप्रकारात निसर्गाला प्राधान्य असल्याने त्यात निसर्गातील घटनेचे चित्रण केलेले असते हे चित्रण चित्रकलेच्या शैलीशी अधिक जवळचे आहे. म्हणूनच हायकूमधील अभिव्यक्तीमध्ये चित्रशैलीचा प्रयत्न येतो असे आपणास मानावे लागेल. हे खालील उदा. वरुन दिसून येईल -

इतक्या वेगानं गाडी पुढे गेली
रस्त्यावर उमललेली रानफुलं
डोळे भरुन पहाताही नाही आली.

- शिरीष पै 'ध्रुवा'
(पृ. क्र. १७)

निष्पर्ण फांदीवर
कळी फुटलीय एखादीच
तर पाखरं आलीच

- शिरीष पै 'हायकू दिवस'
(पृ. क्र. २३)

एकीमागूनदुसरी ... मागून तिसरी

लाटे वरती लाट फुटते

वाळू पुन्हा पुन्हा भिजते.

– शिरीष पै 'हायकू'

(पृ. क्र. ६)

वरील उदा.वरुन आपणास चित्रशैलीचा प्रत्यय येतो.

हायकूमध्ये कमीतकमी अक्षरे व कमीत कमी शब्द वापरणे आवश्यक असते. येथे प्रश्न असा उपस्थित होतो की, हायकूमध्ये अक्षरांना महत्व द्यायचे की शब्दांना ? मराठीच्या भाषेच्या प्रवृत्तीच्या दृष्टीने विचार करायचे झाले तर शब्दांना महत्व देणे योग्य आहे. हायकूमध्ये शब्दांचा नेमकाउपयोग करणे आवश्यक आहे. या शब्दांना म्हणजे कवितेत शब्दांचा जो उपयोग करावयाचा तो विशिष्ठ पध्दतीने करणे आवश्यक ठरते. प्रत्येक ओळीतील शब्दात त्याचा एक नाद,त्याची एक लय असावी लागते. असे झाले नाही तर श्री सुभाष नाईक यांनी म्हटल्याप्रमाणे हायकू पसरट होण्याची शक्यता असते. त्यांनीम्हटले आहे, '' जितक्याजास्त अक्षरांचा थाट आपण स्विकारु तितकी हायकू पसरट होण्याची संभावना वाटते.''[२] हायकूमध्ये प्रत्येक ओळीत कोणते शब्द कसे वापरावयाचे यालाही महत्व आहे. त्या संदर्भात शिरीष पै यांनी म्हटले आहे, ' हायकूच्या पहिल्या किंवादुसऱ्या पंक्तीच्या अखेरीस विराम येतो,''[३] या संदर्भात श्री. सुभाष नाईक यांनी एका हायकूचे उदाहरण दिले आहे. ते अर्थपूर्ण आहे.

उदा. – पाठीमागचा पूल

कोसळला – विलोचे झाड

एकाकी झाले आहे !

हा मूळ हायकू शिरीष पै यांचा असता श्री. सुरेश मथुरे यांनी त्यातील शब्दरचना बदलून वरील प्रकारे रचना केली. परंतु वरील रचना रचना दृष्ट्या सदोष वाटते. शिरीष पै यांचा मूळ हायकू खालील प्रमाणे आहे -

पाठीमागचा पूल कोसळला आहे .
हे झाड विलोचे
एकाकी झाले आहे !

शिरीष पै यांच्या या हायकूची सुरेश मथुरे यांनी रचना बदलली. परंतु तेथे योग्य ठिकाणी विराम न आल्याने रचनेची लय बिघडलेली आहे. शिरीष पै यांची मूळ रचना चांगली असली तरी ती रचना काहीशी पसरट वाटते. त्या मानाने सुभाष नाईक यांनी सुचविलेली रचना लयबध्द वाटते -

पाठीमागचा पूल कोसळला
विलोचे झाड
एकाकी झाले आहे !

ही रचना निर्दोष वाटते. या संदर्भात शिरीष पै यांच्या रचनाबध्दतीवर आक्षेप घेणाऱ्या श्री. सुरेश मथुरे यांनी म्हटले आहे, '' हायकूत एखादे यमक, एखादी सुप्त लय असायला हवी.''[४] याचा अर्थ मथुरे लय तत्व मान्य करतात. हायकूमध्ये ही लय त्यातील विरामामुळे येते.

**यमक : लयीचेतत्व -**

हायकू ह्या काव्यरचनेत लयबध्दता येण्यासाठी रचनेत यमकतत्व मानणे योग्य ठरते. यमकामुळे रचनेला एक ताल येतो. मूळ जपानी हायकूतसुध्दा हे तत्व पाळले गेले

आहे. म्हणून शिरीष पै यांनी म्हटले आहे, ''जपानी हायकूचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यामधला एक सांकेतिक ताल ज्याप्रमाणे आपली अक्षरवृत्ते वृत्ताच्या प्रत्येक ओळीत अक्षरांचे गण पाडून आणि ते मोजून त्यावरुन बांधली जातात. आणि ओळखली जातात, त्याप्रमाणे हायकूवृत्त हे प्रत्येक ओळीतील शब्दांचे त्यांच्या उच्चाराप्रमाणे एका शब्दाची दोन किंवा तीन गटांत विभागणी होऊ शकते. जपानी हायकूतल्या तीन ओळीत पहिल्या ओळीमध्ये सात आणि तिसऱ्या ओळीमध्ये पुन्हा पाच असे शब्दांचे उच्चाराप्रमाणे गट पाडलेले असतात. त्याला शब्दावयव म्हणतात. यमक पहिल्या आणि तिसऱ्या किंवा दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळीत येते.''[५]

उदा. - खिडकीपाशी निमूट बसणे
एकामागून एक गळताना
फुलांना बघत राहणे

- शिरीष पै 'हायकू दिवस '
(पृ. क्र. ३२)

निरोप घेत आहे वसंत
सारखं सळसळतंय
शेतामधलं गवत

- इस्सा

इवलासा पक्षी फांदीवर आला
कधी उडाला ... कळलंच नाही
जरासंही पान हललंच नाही

- शिरीष पै 'ध्रुवा '
(पृ. क्र. २७)

प्रत्येक फांदीवर तरारलीय

तांबुस कोवळी पालवी

रोजची वाट ... झालीच नवी

- शिरीष पै 'ध्रुवा'

(पृ. क्र. २६)

वरील उदाहरणातून यमकाचे लय पध्दतीच्या दृष्टि कोनातून काय महत्व आहे हे आपणास कळू शकते. यमक साधल्याने लयबध्दता निर्माण होते. परंतु यमक नसल्यामुळे काव्याची हानी होईलच असे नाही.

**प्रतिमा : हायकूचे सामर्थ्य -**

हायकू हा काव्यरचनेचा प्रकार आहे. कमीत कमी शब्दांच्या आधारे निसर्गाचे चित्रण करुन त्यातून जीवनानुभव व्यक्त करणारा असा आहे. त्यामुळे त्याला एक प्रकारचा बंदिस्तपणा प्राप्त झाला आहे. कारण ' हायकू ' काव्यरचनेमध्ये प्रत्येक शब्दाला अर्थाच्या दृष्टि कोनातून महत्व प्राप्त झालेले असते. त्यामुळे हायकू या काव्यरचनेमध्ये शब्दांना अधिक महत्व असते. याचा अर्थ हायकू या काव्यरचनेत वापरलेले शब्द ' प्रतिमा - पूरीत ' असतात. त्यामुळे हायकू पसरट होण्यास प्रतिबंध होतो. एकादृष्टीने हायकू हा काव्यप्रकार म्हणजे प्रतिमांची कविता होय. मराठी काव्यात प्रतिमांचा उपयोग स्वच्छंदवादी कवींनी केलेला असला तरी अधिक प्रयोग मर्ढेकर संप्रदायातील नवकवींनी समर्थपणे केला. प्रतिमा हा काव्यघटक अलंकारासारखा असला तरी अलंकारापेक्षा तो वेगळा असतो. कारण, अलंकार हे बाह्य आवरण असते. परंतु प्रतिमा' स्वत:च अनेक पातळींवरुन अनेक अर्थ व्यक्त करतात. या संदर्भात पुढील विधान अर्थपूर्ण वाटते. प्रा. वसंत आबाजी डहाके यांनी म्हटले, '' कवितेत प्रतिमा असतात. किंबहुना कविता हीच अनेक प्रतिमांनी बनलेली एक प्रतिमा असे म्हटले जाते.



14362
A

काव्यक्षेत्रात वेगवेगळे विचारप्रवाह, मते येत असतात, भाषा बदलते, वृत्त किंवा छंदाच्या वापरात बदल होतो. परंतु प्रतिमा मात्र कायमच राहतात. प्रतिमा ही गोष्ट कवितेचागाभाच होय.......

...... ' प्रतिमा म्हणजे शब्दांनी काढलेले चित्र ' अशी सुटसुटीत व्याख्या इंग्रजी कवीसमीक्षक सी. डे लेविस यांनी केलेली आहे. प्रतिमा या काव्यघटकाचा यातून अर्थ स्पष्ट होतो. हायकूसारख्या काव्यप्रकारात अशा प्रकारे प्रतिमांना अधिक महत्त्व असते,''[१] कारण प्रतिमा अनेक प्रकारचा अर्थ व्यक्त करतात. त्यादृष्टीने खालील उदाहरण पाहण्यासारखे आहे.

उदा. - उदासलेलं माझं मन
इतकं प्रसन्न कसं झालं
साधं पाखरु तर बागेत चिवचिवलं

- शिरीष पै 'हायकू'
(पृ. क्र. १४)

या हायकूतले ' उदासलेलं मन ', ' प्रसन्न ' 'बागेतं चिवचिवणारं साधं पाखरु ' हे सगळे शब्द अनेक प्रकारचे अर्थ व्यक्त करु शकतात.

वणवा पेटलाय जंगलात
वृक्ष सारे जळतायत्
फुलंसुध्दा धुमसतायत्

- शिरीष पै 'ध्रुवा '
(पृ. क्र. २०)

निष्पर्ण फांदीवर

कळी फुट लीय एखादीच

तर पाखंर आलीच

- शिरीष पै 'हायकूचे दिवस'

(पृ. क्र. २३)

हायकू काव्यात शब्दरचनेला महत्व कां असते हे यातून दिसून येईल. हायकूतील शब्दांना प्रतिमांचे सामर्थ्य प्राप्त होणे आवश्यक असते.

**हायकू रचनेतील एकात्मता :**

हायकू या काव्यरचनेत निसर्गातील एका घटनेच्या आधारे जीवनानुभवाचे चित्रण केले जाते. तेथे निसर्ग घटनेला महत्व असल्याने निसर्गाचे स्थळ, काळ, वेळ याचा सूचक उल्लेख त्यात आढळतो, या संदर्भात शिरीष पै यांनी म्हटले आहे की, '' हायकूच्या रचनेत आणखीही काही वैशिष्ट्ये अंतर्भूत आहेत. बहुधा प्रत्येक हायकू ' कुठे ' ' काय ' आणि ' कधी ' ह्या तीन प्रश्नांची उत्तरे देतो, म्हणजेच स्थळ, घटना आणि काळ ह्यांचा उल्लेख हायकूतून बहुधा असतोच. स्थळाचा उल्लेख हायकूत नसलातरी साधारणत: वाचकाला हायकूमधील इतर संदर्भामुळे स्थळ समजू शकते, पण काळाचा म्हणजे ऋतूचा उल्लेख मात्र हायकूत बहुधा असतोच. तो प्रत्यक्ष नसला तरी अशी प्रतीके वापरलेली असतात. की जी ऋतूंमधले बदल सुचवतात,''[७] शिरीष पै यांचा हा विचार महत्वाचा वाटतो, कारण हायकूतील रचना हे एक कथा चित्र असते. कथेच्या संदर्भात ॲरिस्टॉटल यांनी म्हटले आहे की, उत्कृष्ट प्रकारच्या कथानकात स्थलैक्य (Unity of place) कालैक्य (Unity of time) आणि कृत्यैक्य (Unity of action) असणे आवश्यक आहे. हाच सिध्दान्त हायकूला तंतोतंत लागू पडतो. कारण, हायकूमध्ये निसर्गातील घटनेचे 'स्थळ ' दिलेले असते. ' काळ ' (सकाळ, संध्याकाळ, रात्र, चांदणे, भरती, ओहोटी वेगवेगळे प्रकारचेऋतू वगैरे) दिलेला असतो. तसेच कोणती घटना घडली त्याही घटनेचे वर्णन असते.

उदा. - सकाळ झाली तरी
जळतायत् दिवे रस्त्यावर
जाळून जाळूनरात्रभर

– शिरीष पै

हायकू पृ. २१

या हायकूत ' सकाळ' या वेळेचा (time) उल्लेख आहे. ' रस्ता ' या स्थानाचा (Place) आणि ' रात्रभर दिव्यांचे जळणे ' या कृतीचा (action) उल्लेख आहे. त्यामुळे हायकूतील घटनेला दृश्यात्मकता, चित्रमयता प्राप्त होते.

**समारोप :**

वरील चर्चेवरुन असे दिसून येईल की, हायकू हा एक बंदिस्त काव्यप्रकार आहे. त्यासाठी रचनेची वर चर्चिलेली बंधने पाळावी लागतात. ती पाळली नाहीत तर, शिरीष पै यांनी म्हटल्याप्रमाणे '' ती रचना ' शुध्द ' 'हायकू ' न बनता ' हायकू सदृश्य ' रचना बनेल. '' अशा रचनेचा केवळ कविता म्हणूनच उल्लेख केला जातो. याचाच परिणाम असा झाला असावा की, मराठी काव्यामध्ये हायकू सदृश्य रचना' बरीचशी झाली. परंतु ' शुध्द हायकू ' रचना होऊ शकली नाही. त्यामुळे इतरकाव्य प्रकारामध्ये जशी विपुल रचना झाली. तशी हायकू या काव्यप्रकारात झाली नाही. असे म्हणावेसे वाटते. तथापी, तंत्राची बंधने पाळून शिरीष पै आणि शांता शेळके यांनी मात्र हायकू काव्यरचनेत उत्कृष्ट प्रकारच्या रचना केल्या. या संदर्भात असे म्हणावे लागते की, मराठी काव्यात गझल या काव्यप्रकाराची चर्चा व रचना करुन श्री. सुरेश यांनी ' गझलसम्राट ' हे पद मिळविले. त्याचप्रमाणे शिरीष पै यांनी याकाव्यप्रकाराची चर्चा व रचना करुन ' हायकू - सम्राज्ञी ' पद. मिळविले. मराठी काव्याला एक नवा आणि समृध्द काव्य प्रकार देण्यात त्यांचे फार मोठे योगदान आहे.

———— ० ————

# प्रकरण तिसरे

## संदर्भ - सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | पै शिरीष | - | प्रस्तावना ' हायकू ' पृष्ठ —— |
| २) | नाईक सुभाष | - | चर्चा, सत्यकथा - ऑक्टोबर १९८१ पृष्ठ ४० |
| ३) | पै शिरीष | - | सत्यकथा |
| ४) | मथुरे सुरेश | - | चर्चा - सत्यकथा, पृष्ठ ३८ |
| ५) | पै शिरीष | - | प्रस्तावना ' हायकू ' पृष्ठ १२ |
| ६) | ड हाके वसंत अंबाजी | - | वाङ्मय प्रकार - आकलन व रसास्वाद, पुस्तक क्र. १, क्र. ५० - ५१, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ. |
| ७) | पै शिरीष | - | प्रस्तावना ' हायकू ' पृ. २३ |